महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ खालील आदेश

2961 / जा.क्र.प्रशासन/नांदेडजिमसबँक/क.८३/चौ./०७
कार्यालय,विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,
लातूर दिनांक :- 18 /१२/२००७

वाचा :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ व नियम ७२

वाचले :- १. या कार्यालयाचे आदेश जा.क्र.प्रशासन/नांजिमसबँक/नियम८९(६)(पाच)/नि/०४
दि.२५.०८.२००४ व दिनांक १९.३.२००५

२. मा.सहकार मंत्री,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५२ अन्वये अपील अर्जावरील दि.१० नोव्हेंबर २००६ चे आदेश

३. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था,(लेखापरिक्षण) औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.पुर्नलेप/नांजिमसबँ/सन२०००-०१/०१-०२/४५/२००७ दि.१०.०१.२००७ अन्वये सादर केलेल्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.नांदेड बँकेचा सन २०००-०१ ते २००१-०२ या कालावधीचा फेरलेखापरिक्षण अहवाल.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.नांदेड या बँकेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मधील तरतुदीप्रमाणे झालेली असून तिचा नोंदणी क्रमांक एन/२०२१५ दि.२८.०६.१९२३ असा आहे आणि,

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.नांदेड (यापुढे उक्त बँक असे वाचावे) या बँकेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याखालील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ ( यापुढे उक्त अधिनियम व नियम असे वाचावे) व बँकेच्या नोंदणीकृत उपविधीतील तरतुदीप्रमाणे करण्यांत येते या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण नांदेड महसूली जिल्हा आहे. शासनाकडील आदेश क्र.सीएमएल/१४९३/११६२/सीआर४७/ १५-सी दिनांक २६.०७.१९९१ नुसार विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था हे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नोंदणी अधिकारी व निबंधक असून या बँकेच्या कामकाजाबाबत उक्त अधिनियमाच्या तरतूदींचे अधिसुचना क्र. दि.७/८/९३ अन्वये अधिकार त्यांना प्रदान केले आहे आणि,

कायदा कलम ७३ (१) नुसार बँकेच्या संचालक मंडळाचे अधिकार कर्तव्य आणि जबाबदारी निश्चित करण्यांत आलेली असून त्या प्रमाणे त्यांनी त्यांचे वैधानिक कर्तव्ये व जबाबदारी पार पाडावयाची आहे.

पान क्र.२ वर....

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.नांदेड या बँकेच्या विरुध्द कलम ८८ अंतर्गत या कार्यालयाचे आदेश क्र.प्रशासन/नांजिमसबँक/कलम८८/चौ./६००/०५ दिनांक २४/०५/२००५ व दि.१८/०८/२००५ अन्वये कारवाई सुरु केली होती. सदरील कार्यवाहीचे अनुषंगाने चौकशी करुन प्राधिकृत अधिका-याने संबधीत व्यक्तीविरुध्द दोषारोप पत्र बजावल्यानंतर दोषारोपीत व्यक्तींनी मा. मंत्री महोदयाकडे केलेल्या अपील अर्जासंदर्भात मा. मंत्री महोदयानी वरील वाचले क्रं.२ अन्वये निकाल दिलेला असुन त्यामध्ये या "कार्यालयाने फेरलेखापरिक्षणाचे आदेश निर्गमीत केले असल्याने पुर्वीच्या लेखापरिक्षण अहवालाच्या आधारे चौकशी करणे योग्य नसल्याचे अर्जदाराचे प्रतिपादन उचित ठरते" असे आदेशात नमुद केलेले असुन "फेरलेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यावर त्या आधारे विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यथायोग्य कार्यवाही करु शकतील"असे निष्कर्ष काढलेले आहेत आणि, वाचले क्र.३ नुसार विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (लेखापरिक्षण) औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांनी या कार्यालयास सन २०००-०१ ते २००१-०२ या कालावधीचा फेरलेखापरिक्षण अहवाल सादर केलेला असुन सदरील फेरलेखापरिक्षण अहवालाचे अवलोकन केले असता उक्त बँकेच्या व्यवहारातील अनियमीतता, निधींचा गैरवापर,भारतीय रिझर्व्ह बँक व नाबार्डच्या परिपत्रकीय सुचनांचे तसेच बँकेच्या उपविधीतील तरतूदींचे उल्लंघन करुन केलेले कर्जवाटप व त्यामुळे बँकेस आर्थिक नुकसान झाले आहे काय याची शहानिशा करणेच्या आवश्यकतेबाबत माझी खात्री झाली आहे आणि अशी कृती म्हणजे वारंवार करण्यात आलेली कारवाई नसुन मा. सहकार मंत्री यांनी संदर्भ क्र.२ अन्वये दि.१०.११.२००६ अन्वये निर्गमीत केलेल्या न्यायोचीत आदेशाचे अनुपालनार्थ केलेली कारवाई आहे मा.मंत्री महोदयानी सुस्पष्ट आदेश दिल्यानंतर ही आणि फेरलेखापरिक्षण अहवाल प्राप्त झालेनंतर त्या आधारे कारवाई न करणे कर्तव्यच्युती ठरेल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-// आदेश //-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत शासन अधिसूचना क्र.सीएसएल -२४९३/१९६५/सीआर-४७/१५-सी दि.७/८/९३ आणि शासन आदेश दि.२७/८/९९ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, फ.अ.शेख, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,लातूर या आदेशान्वये सोबतच्या परिशिष्टा मध्ये नमुद केल्याप्रमाणे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.नांदेड

पान क्र.३ वर....

या बँकेच्या रचना कार्यपध्दती व घटना यांचे दृष्टीकोनातुन बँकेच्या संचालक मंडळाचा/अधिका-याचा /कर्मचा-याचा कर्तव्यातील कसुर अथवा विहित कार्यकक्षा/मर्यादेचे उल्लघन करून केलेली कृती, अनियमीतता, दुराचार, दुर्विनियोग,अथवा अधिकाराचा गैरवापर इत्यादी कारणास्तव बँकेच्या व्यवहारामध्ये आर्थिक नुकसान झाले असल्यास त्याबाबतची निश्चिती करण्यासाठी कलम ८३ चौकशी आदेशीत करीत आहे आणि सदरची चौकशी करण्यासाठी श्री पवार एस.एल.जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था,नांदेड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. नियुक्त अधिकारी यांनी त्यांचा अहवाल सदर आदेशाच्या दिनांकापासून ३ महीन्याच्या आत या कार्यालयास सादर करावा. सदर वैधानिक चौकशीसाठी लागणारी स्टेशनरी, पोस्टेज व इतर अनुषंगीक खर्च बँकेकडून घेवून परस्पर भागविण्यांत यावा.

चौकशी अधिका-यांचे मानधनाबाबतचे आदेश अलहिदा निर्गमीत करण्यांत येतील

सदरील आदेश आज दिनांक १८/१२/२००७ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमीत केली असे.

( फ.अ.शेख )
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था,लातूर

**प्रति,**

१. श्री.पवार एस.एल.जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था,नांदेड चौकशी अधिकारी यांना देवून सुचित करण्यांत येते की, त्यांनी आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्टा मधील प्रत्येक मुद्यावर कलम ८३ अंतर्गत चौकशी करुन अहवाल विहीत मुदतीत सादर करावा. या मुद्या व्यतिरिक्त अन्य आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्याबाबतचा अहवाल स्वंतत्ररित्या करण्यात यावा.
२. सरव्यवस्थापक, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.नांदेड
३. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,नांदेड
४. विशेष लेखापरिक्षक वर्ग-२ सहकारी संस्था (बँक) नांदेड
५. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (लेखापरिक्षण) औरंगाबाद

<u>प्रत</u>

१. मा.विशेष कार्य अधिकारी ,महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मुंबई
२. मा. कार्यकारी संचालक, ,महाराष्ट्र राज्य,सहकारी बँक म. मुंबई -३२

पान क्र.४ वर....